# गुरुमाई चिद्विलासानंद यांच्याद्वारे लिखित पुस्तक
# अंतःशुद्धीचे सोपान

*उद्धरण ८*

दोन आठवड्यांपूर्वी एक मुलगा आश्रमात आला होता. आज सकाळी, त्याचे वडील, आश्रम-निवासादरम्यानचा त्यांच्या मुलाला आलेला अनुभव मला सांगत होते. त्यांनी सांगितले की, त्यांचा मुलगा जेव्हा घरी परत आला, तेव्हा तो पूर्णपणे बदलून गेला होता, इतका की त्याच्या वडलांचा त्यावर विश्वासच बसत नव्हता. मुलगा म्हणाला, "बाबा, मला आश्रमाच्या प्रत्येक पानामध्ये ईश्वराचे दर्शन होत होते." तो खूपच हेलावून गेला होता. खरे तर, मला ती वेळ आठवते, जेव्हा हा मुलगा किशोरांसाठी झालेल्या ध्यानशिबीरानंतर दर्शनाकरिता आला होता आणि मला म्हणाला होता, "गुरुमाई, इतकी वर्षे मी माझ्या आई-वडलांशी फार स्वार्थीपणाने वागलो, मी त्यांचे प्रेम कधी समजूच शकलो नाही. यासाठी मला तुम्ही क्षमा कराल का? मला क्षमा मिळावी असे मला खरोखरच वाटते. मला खरोखरच असे वाटते आहे."

मी त्या मुलाला एका विशिष्ट व्यक्तीशी जाऊन बोलायला सांगितले. त्या व्यक्तीने त्याला सल्ला दिला, की त्याने आपल्या आईवडलांना लगेचच फोन करून सांगावे की, त्याला काय वाटते आहे. त्याने अगदी तसेच केले. त्याने त्याच्या आईवडलांना फोन करून सांगितले, "मी त्यांच्याकडे क्षमायाचना केली आहे. मी गुरुमाईंकडे गेलो होतो," आणि त्याने त्यांना सारे काही सांगितले.

त्याच्या आईवडलांचे हृदय अगदी भरून आले. नंतर, या ग्रीष्मात जेव्हा त्याचे वडील येथे आले, तेव्हा ते पूर्ण वेळ आपल्या मुलाबद्दलच बोलत होते. जेव्हाजेव्हा मला ते दिसले, तेव्हातेव्हा ते मला त्यांच्या मुलाची गोष्ट पुन्हा सांगू लागत. "माझा मुलगा! माझा मुलगा, मी त्याच्या डोळ्यांमध्ये रूपांतरणाचे अश्रू पाहिले. मी त्याचा बदललेला आवाज ऐकला. माझ्या मुलाने प्रत्येक पानामध्ये ईश्वराला पाहिले."

मी मान डोलावत राहिले. "हो, हो." ते खरोखरच अद्‌भुत होते. जेव्हा आपण एखाद्या व्यक्तीला रूपांतरणाचा अनुभव सांगताना ऐकतो, तेव्हा ते ऐकून आपले हृदय द्रवते. प्रत्येक वेळी तुम्ही जेव्हा विचार करता की, ही गोष्ट तुम्ही खूपदा ऐकली आहे, तेव्हा ती तुमच्या अस्तित्वाच्या दुसऱ्याच भागाला

स्पर्श करते. ज्या प्रकारे ती व्यक्ती ती गोष्ट सांगते, ज्या प्रकारे ती गोष्ट तुम्हाला प्रभावित करते, त्यामुळे तुम्हाला हे जाणवते, "अरे, आणखीही काहीतरी आहे. . ." करुणा. जेव्हा तुम्ही एकत्रितपणे करुणाभावाची अनुभूती करता, तेव्हा तुम्ही परस्परांमध्ये ईश्वराला पाहू शकता.

© २०२२ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.

गुरुमाई चिद्विलासानंद, *अंतःशुद्धीचे सोपान : दिव्य सद्गुणांचा योग,* अध्याय ९ 'करुणा,' यामधून उद्धृत [चित्शक्ती पब्लिकेशन्स, २०१३], पृ. १२१-१२२.